# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(पत्रपरिषद)**

**दिनांक १४.१०.२०२६ बुधवार**

**२१ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा —२०२६ पुणे येथे आयोजीत स्पर्धेमध्ये नागपूर शहर पोलीसांनी उल्लेखनीय कामगिरी करून, एकुण १२ पदकांची कमाई करीत राज्यात द्वितीय क्रमांक पटकाविला.**

दिनांक ०५.१०.२०२६ ते १०.१०.२०२६ या कालावधीत SRPF ग्रुप क्रमांक १ हडपसर, पुणे येथे २१ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा—२०२६ पार पडला आहे. नमुद कर्तव्य मेळाव्याकरीता नागपूर शहर येथून ४ अधिकारी व १७ अंमलदार असे एकुण २१ स्पर्धेक सहभागी झाले होते. कर्तव्य मेळाव्यामध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये नागपूर शहर पोलिसांनी निरीक्षण, व्यक्तिचित्र (Portrait), फौजदारी कायदा, न्यायवैद्यक शास्त्र, वैद्यकीय—कायदेशीर तपासणी, पोलीस व्हिडिओग्राफी, श्वान स्पर्धा, फिंगरप्रिंट आणि संगणक स्पर्धा इत्यादी विविध क्षेत्रांत आपले कौशल्य सिद्ध करून ४ सुवर्ण, ४ रौप्य आणि ४ कांस्य अशी एकूण १२ पदकांची कमाई करून महारा ट्र राज्यात द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. स्पर्धेमध्ये ATS मुंबई यांनी प्रथक क्रमांक पटकाविला आहे.

स्पर्धेकरीता गुन्हेशाखेचे पोलीस निरीक्षक, श्री. दिलीप चंदन यांनी समन्वय अधिकारी म्हणून कामगीरी बजावली असून, पोलीस निरीक्षक, राखी गेडाम, गुन्हेशाखा व त्याची टीम यांनी सर्व स्पर्धकांचे पुर्व तयारी करीता नियोजन केले होते. प्रशिक्षक १) श्री. डॉ. आशिष बढीये २) श्रीमती डॉ. निती कपूर (सहा. प्राध्यापक शासकिय न्याय सहायक वैज्ञानिक संस्था, नागपूर) ३) श्रीकांत अर्धापूरकर (फॉरेन्सीक एक्सपर्ट) ४) सपोनि. प्रविन मुन (सी.आय.डी.) ५) सपोनि. पुजा लगस (सी.आय.डी.) ६) श्री. सचिन पानसे, गुन्हे अन्वेषण विभाग, नागपूर. ७) श्री. अमोल सहारे, गुन्हे अन्वेषण विभाग, नागपूर. ८) पोहवा. दिपक बुलबुले, जिल्हा — भंडारा (पोलीस व्हिडीओग्राफी एक्सपर्ट) यांनी स्पर्धकांना मोलाचे मार्गदर्शन करून योग्य पुर्व तयारी करून घेतली.

मा. श्री. सदानंद दाते पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १०.१०.२०२६ रोजी उप—विजेता नागपूर शहर संघास चषक देवून सन्मानीत केले आहे. पदक प्राप्त अधिकारी/अंमलदार यांची यादी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्रं. | अधिकारी अंमलदार नाव पदनाम | स्पर्धेचे नाव | पदक |
|---|---|---|---|
| १ | पोनि प्रशांत ठवरे | फौजदारी कायदा परीक्षा (Criminal Law Exam) | सुवर्ण |
| २ | पोनि. प्रशांत ठवरे | न्यायवैद्यक शास्त्र लेखी परीक्षा (Forensic Science) | रौप्य |
| ३ | पोनि. प्रशांत ठवरे | वैद्यकिय कायदे (Medico-Legal) | रौप्य |
| ४ | मसपोनि. अश्विनी काळे | फिंगरप्रिंट प्रात्यक्षिक (Fingerprint Practical & Oral ) | रौप्य |
| ५ | पोअं/१६०३२ कुनाल हटेवार | माहिती तंत्रज्ञान—इव्हेंट (Information Technology Proficiency, Software Development Capability) | सुवर्ण |
| ६ | पोअं/१६०३४ पलाश वाघमारे | | सुवर्ण |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | मपोअं/१६१६३ प्रतिक्षा नागापुरे | निरीक्षण (Observation Test) | सुवर्ण |
| ८ | मपोअं/१६१६३ प्रतिक्षा नागापुरे | व्यक्तिचित्र (Portrait Test) | रौप्य |
| ९ | मपोहवा/३५४४ रसिका घायवट | व्यक्तिचित्र (Portrait Test) | कांस्य |
| १० | पोअं/६७६७ चंद्रप्रकाश पाटने | पोलीस व्हिडीओग्राफी ( Police Videography) | कांस्य |
| ११ | पोहवा/११६६ सुखदेव धुर्वे (Dog Surya) | श्वान स्पर्धा (Narcotics Detection, Vehicle Search, Room Search, Obedience Test and Refusal of Food ) | कांस्य |
| १२ | पोअं/६५६३ अभय धंदी (Dog Surya) | | कांस्य |

या यशामुळे नागपूर शहर पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांचे तपासकामातील तांत्रिक ज्ञान, निरीक्षण कौशल्य, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि व्यावसायिक क्षमता अधोरेखित झाली आहे. वैज्ञानिक पद्धतींचा प्रभावी वापर करून गुन्ह्यांचा तपास अधिक अचूक व परिणामकारक करण्यासाठी हे यश निश्चितच प्रेरणादायी आहे.

स्पर्धेकरीता मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्री. नवीनचंद्र रेडड्ी, सह पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. पोलीस उप आयुक्त, श्री. दीपक अग्रवाल (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनात, वर नमुद अधिकारी व अंमलदार यांनी मोलाची कामगिरी केलेली आहे.

नागपूर शहर पोलीस दलाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व पदक विजेत्यांचे हार्दिक अभिनंदन.




**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**